NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक १९.१०.२०२६ सोमवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक १८.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण १०,९११ /–रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०२ केसमध्ये १६ ईसमावर कारवाई करून एकुण ३२,३३०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ३० केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १६ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ९४ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ६३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ३४ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०२ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १७३ केसेस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०६ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०१ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ५६० केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०७ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १७ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,०११ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. १,५९,९००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) पोलीस ठाणे भांडेवाडी येथील नगरसेवक यांचे खुनाचा प्रयत्नातील आरोपींविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई.

दिनांक २६.०८.२०२६ चे १२.४२ चे सुमारास, फिर्यादी नगरसेवक शुभम शेषरावजी मोटघरे, वय ३१ वर्षे, रा. प्लॉट नं. ७१, श्रावण नगर, भांडेवाडी, नागपूर हे त्यांचे घराचे पहील्या माळ्यावरील हॉलमध्ये गेले असता, त्यांना ब्लास्ट झाल्यासारखा आवाज आल्याने त्यांनी गॅलरीत येवुन पाहीले असता, गॅलरीतील काच तुटलेला दिसला. त्यांनी त्यांचे घराचे सिसिटीव्ही ची पाहणी केली असता, मोपेड गाडीवरील दोन ईसमांपैकी मागे बसलेला याने अग्नीशस्त्राने फायर केल्याने काच फुटल्याचे दिसुन आले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे अज्ञात आरोपींविरूध्द कलम १०९(१), ३२४, ३(५) भा.न्या.सं., सहकलम २७(१) भा.ह.का., १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन व गुप्त खात्रीशीर माहितीवरुन, परिसरात आरोपींचा शोध घेवुन, आरोपी क्र. १) अंकुश झनक तोमस्कर, वय ३० वर्षे, २) ऋषभ उर्फ ऋषी विशाल नागदेवे, वय २४ वर्षे, ३) अमीत मधुकर ठाकरे, वय २२ वर्षे, ४)

कार्तीक बबलु तोमस्कर, वय २६ वर्षे, ५) ऋषभ भगवती पेथेल, वय ३० वर्षे, ६) केतन दुर्गाप्रसाद माटे, वय २४ वर्षे, ७) रोमीत उर्फ फुल्ल्या मुनेश्वर वाहाने, वय २१ वर्षे यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न करून, त्यांना दिनांक ०४.०९.२०२६ चे १८.०४ वा. गुन्ह्यात अटक केलेली होती. पाहीजे आरोपी नामे विशाल उर्फ फल्ली गुप्ता, रा. श्रावण नगर, भांडेवाडी, नागपुर याने अटक आरोपी क्र. १ व २ यांना फिर्यादीचे घरावर गोळीबारी करण्याची सुपारी दिल्याचे निष्पन्न झाले होते.

गुन्ह्यातील आरोपी हे संघटीत गुन्हेगारी टोळीचे सदस्य आहेत. त्यांनी संगणमताने कट रचुन नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झालेले आहे. ते कोणताही समाजमान्य कामधंदा न करता, त्यांनी नागपुर शहरात अनेक ठिकाणी मालमत्तेविरूध्द व शरीराविरूध्द अनेक गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असुन, त्यांचे कृत्याने सामान्य नागरिकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(i)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा– १९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. आरोपी क्र. १ ते ७ हे मध्यवर्ती कारागृह येथे बंद आहेत. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. विनायक गोल्ह व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

३)गुन्हेशाखा युनिट क्रं. २ पोलीसांची कामगिरी :– गंभीर दुखापत करणाऱ्या आरोपींना अटक. ०५ गुन्हे उघडकीस.

दिनांक १६.१०.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सदर हद्दीत, गड्डीगोदाम ॲलेक्स मॅकॅनिकल वर्क्स जवळ, प्लॉट नं. ६७० ए, कामठी रोड, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती हिल्डा ॲलेक्झांडर ॲन्थोनी, वय ८२ वर्षे ह्या आपले घरी हजर असतांना, एक अनोळखी ईसम वय अंदाजे २५ ते ३० वर्षे याने फिर्यादीचे घरी येवुन, डोअरबेल वाजविली असता, त्यांनी दार उघडले. ईसमाने तोंडावर कापड बांधलेले होते. त्याने त्याचे जवळील लाकडी दांड्याने, फिर्यादी यांचे डोक्यावर मारून जखमी केले. फिर्यादीने आरड–ओरड केल्याने, परीवारातील वरचे माळ्यावर राहणारे सदस्य धावत आल्याने आरोपी ईसम तेथुन पळुन गेला. फिर्यादी यांचा उपचार किंग्सवे हॉस्पीटल येथे करण्यात आला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे आरोपींविरूध्द कलम ११८(२), ३३३ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांनी त्वरीत दखल घेवुन तांत्रीक तपास करून, आरोपीस निष्पन्न केले, व सापळा रचुन आरोपी नामे क्लेमेंट उर्फ रोहीत युजीन पिल्ले, वय ३५ वर्षे, रा. प्लॉट नं. ३३/ए, किराड ले–आऊट, मानकापुर, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे सदर येथे चोरी, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत घरफोडी तसेच, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत जबरी चोरी व विनयभंगाचा गुन्हा असे एकुण ०५ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव सदर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री.

दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. शुभांगी देशमुख व सपोनि. चेतन बोरखेडे, पोउपनि. मनोज राऊत, सफौ. गजेंद्रसिंग ठाकुर, पोहवा. नरेश तुमडाम, विजय यादव, प्रविण शेळके, अर्जुन यादव, महेंद्र सडमाके, कमलेश गणेर, पोअं. मंगल जाधव, संदीप पांडे, आशिष धंदरे, संजीव दहीफळे व चापोहवा. कमलेश गहलोद यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे राणाप्रताप नगर :– शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक १८.१०.२०२६ चे २१.०५ वा. चे सुमारास, प्रतापनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, मंजीरी टेक्सटाईल्स जवळ, प्रतापनगर चौक येथे एक हिरव्या रंगाचा शर्ट व निळा जिन्स पॅन्ट घातलेला ईसम शस्त्रासह फिरत आहे, अशा माहीतवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव समीर राधेशाम चिंचुलकर, वय २६ वर्षे, रा. रमाबाई आंबेडकर नगर, जयताळा, एमआयडीसी, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक लोखंडी धारदार चाकु किंमती २००/– रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोअं. राहुल गावंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे पोउपनि. स्वप्नील राऊत यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे कोराडी :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक १८.१०.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे वडील नामे प्रभाकर सोनु भोईटे, वय ६२ वर्षे, रा. बेटावत बुद्रुक, तह. जामनेर, जि. जळगांव, ह.मु.– मुलीचे घरी नविन कोराडी, किंग्स हॉटेल जवळ, महादुला, नागपुर हे पायदळ कोराडी देवी मंदीर येथे दर्शनाकरीता गेले होते. पोलीस ठाणे कोराडी हद्दीत वंजारी भवन बस स्टॉप चे विरूध्द दिशेचे रोडवर, नविन कोराडी येथे रोड क्रॉस करण्याकरीता उभे असतांना, सावनेर कडुन नागपुरकडे येणाऱ्या एका चारचाकी वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन, फिर्यादीचे वडीलांना धडक देवुन गंभीर जखमी केल व पळुन गेला. लोकांनी गंभीर जखमी फिर्यादीचे वडीलांना उपचाराकरीता जिल्हा रूग्णालय मानकापुर व तेथुन डॉक्टरांनी रेफर केल्याने मेडीकल

हॉस्पीटल ट्रॉमा सेंटर येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दि. १९.१०.२०२६ चे ००.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले होते.

याप्रकरणी फिर्यादी श्रीमती दिपाली ऋषीकेश मोहीते, वय ३४ वर्षे, रा. नविन कोराडी, किंग्स हॉटेल जवळ, महादुला, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. महेंद्र मिश्रा ८९९९९६७८२९ यांनी चारचाकी वाहन चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१, १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४(अ)(ब), १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

१) पोलीस ठाणे गणेशपेठ :– दिनांक १८.१०.२०२६ चे १७.०० वा. चे सुमारास, कामगार नामे संजीव कार्तीक चक्रबोटी, वय २६ वर्षे रा. शंभुनगर, तह. बारनिया, जि. नांदीया (प. बंगाल) हा पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत, रजवाडा पॅलेस समोर, निमा नादीन बिल्डींग, आय विंग येथे काम करीत होता व तेथेच लेबर कॅम्पमध्ये हल्ली मुक्कामी राहण्यास होता. बिल्डींगमधील दुसऱ्या माळ्यावर लिफ्ट शर्टरींग चे काम करीत असतांना, त्याचा अचानक तोल जावुन, तो जमीनीवर खाली कोसळल्याने त्याचे डोक्याला मार लागुन तो गंभीर जखमी झाला. त्याचे सोबत काम करणारे यांनी त्यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे सफौ. समीर शेख यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

२) पोलीस ठाणे पारडी :– दिनांक १८.१०.२०२६ चे ११.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा पुतण्या नामे कुणाल राजेंद्र मसने, वय ३० वर्षे रा. साई जिम जवळ, गंगाबाग, पारडी, नागपुर हा पोलीस ठाणे पारडी हद्दीत, प्लॉट नं. १९०, अन्नपुर्णा किराणा दुकानाजवळील निर्माणाधीन फ्लॅट स्किमचे तिसरे माळ्यावर ईलेक्ट्रीक फिटींगचे काम करीत असतांना, त्याचा पाय घसरून तो जमीनीवर खाली कोसळल्याने त्याचे डोक्याला मार लागुन तो गंभीर जखमी झाला. त्याचे सोबत काम करणारे यांनी त्यास उपचाराकरीता भवानी हॉस्पीटल, पारडी येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी मोहन देवराव मसने, वय ४३ वर्षे, रा. प्लॉट नं. ६३, साई जिम जवळ, गंगाबाग, पारडी, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे पारडी येथे पोउपनि. भागवत काळींगे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

स्वा/–
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.